20-04-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 04/19/2025 9:36 PM Page 1



एचपीव्ही लसीकरण मोहिमेला सुरुवात पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड



घरच्या मैदानावर बंगळुरूचा पराभव पान ४ वर

वेर्णा, रविवार, २० एप्रिल २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 227 | Verna, | facebook.com/dainikherald | Sunday 20 April 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### दिल्लीत इमारत कोसळून ११ ठार

**नवी दिल्ली, दि. १९ :** दिल्लीच्या मुस्तफाबाद परिसरात शनिवारी रात्री एक इमारत कोसळून मोठी दुर्घटना घडली. या दुर्घटनेत आतापर्यंत अकरा जणांचा मृत्यू झाला आहे. तर अनेक लोक ढिगाऱ्याखाली अडकल्याची शक्यता आहे. एनडीआरएफ आणि दिल्ली पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी पोहोचले असून त्यांनी बचाव कार्य सुरू केले. अतिरिक्त पोलिस उपायुक्त संदीप लांबा यांनी दिलेल्या माहितीनुसार आतापर्यंत २० लोकांना सुरक्षितपणे बाहेर काढले आहे. अग्निशामक दलाचे अधिकारी राजेंद्र अठवाल यांनी सांगितले की, आम्हाला रात्री २.५० वाजता इमारत कोसळल्याची माहिती मिळाली. आमचे पथक घटनास्थळी पोहोचले तेव्हा संपूर्ण इमारत जमीनदोस्त झाल्याचे दिसले. ढिगाऱ्याखाली काही लोक अडकल्याची माहिती स्थानिकांनी दिल्यानंतर आम्ही तात्काळ बचावकार्य सुरू केले.

---

### भारतात येणार ८ नवीन चित्ते

नवी दिल्ली, दि. १९ : दक्षिण आफ्रिकेतील बोत्सवाना येथून ८ चित्त्यांचे भारतात आणले जाणार आहे. त्यांना दोन टप्प्यात आणले जाईल. त्यापैकी ४ चित्ते मे पर्यंत भारतात येतील, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या उपस्थितीत झालेल्या चित्ता प्रकल्प आढावा बैठकीत उपस्थित होते. दक्षिण आफ्रिका, बोत्सवाना आणि केनिया येथून आणखी चित्ते भारतात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. दोन टप्प्यांत ८ चित्ते भारतात आणले जातील. मे महिन्यापर्यंत बोत्सवाना येथून ४ चित्त्यांना भारतात आणण्याची योजना आहे. त्यानंतर आणखी ४ चित्त्यांना आणण्यात येईल.

---

### जम्मू, दिल्लीत भूकंपाचे धक्के

नवी दिल्ली, दि. १९ : अफगाणिस्तानात शनिवारी दुपारी १२:१७ वाजता ५.८ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला. भूकंपाचे धक्के जम्मू-काश्मीर आणि दिल्ली-एनसीआरपर्यंत जाणवले. सुदैवाने कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झालेली नाही. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या म्हणण्यानुसार, भूकंपाचे धक्के जम्मू आणि काश्मीरच्या काही भागातही जाणवले. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्रनुसार, भूकंप पृष्ठभागापासून ८६ किलोमीटर खाली झाला.

---

### पंजाबमध्ये १३ दहशतवाद्यांना अटक

अमृतसर, दि. १९ : पंजाब पोलिसांनी पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय आणि बब्बर खालसा इंटरनॅशनल (बीकेआय) शी संबंधित १३ दहशतवाद्यांना अटक केली आहे. यामध्ये १ अल्पवयीन आहे. चार दिवस चाललेल्या पंजाब पोलिसांच्या कारवाईत दोन दहशतवादी मॉड्यूलचा नाश करण्यात आला आहे. पोलिसांचा दावा आहे की त्यांचे लक्ष्य पोलिस ठाणे प्रमुख होते. अटक केलेल्या दहशतवाद्यांकडून २ रॉकेट प्रोपेल्ड ग्रेनेड (आरपीजी), १ ग्रेनेड लाँचर, २.५ किलो वजनाचे दोन इम्प्रोवाइज्ड एक्सप्लोझिव्ह डिव्हाइस (आयईडी), डेटोनेटर्स, २ हँड ग्रेनेड, रिमोट कंट्रोल आणि २ किलो रॉयल डिमोलिशन एक्सप्लोझिव्ह (आरडीएक्स), ५ पिस्तूल (बेरेटा आणि ग्लॉक), ६ मॅगझिन, ४४ काडतुसे, १ वायरलेस सेट आणि ३ वाहने जप्त करण्यात आली आहेत.

### हवामान

कमाल : ३३ किमान : २३
आर्द्रता : ७४

### बाजार भाव

सोने : ₹ ९८,००० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ९९,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५.७७ ↑ (२३१.१६)
निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

# हायवेमुळे भोममधील एकही घर, मंदिर बाधित नाही : मुख्यमंत्री

## सोमवारी मंत्रालयात होणार प्रकल्पाच्या आराखड्याचे सादरीकरण

टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १९ : महामार्ग रुंदीकरणाच्या कामात भोममधील एकाही घराच्या किंवा मंदिराच्या कोपऱ्याला जराही धक्का लागणार नाही आणि तसे निदर्शनास आल्यास आपण रस्त्याचा प्लान बदलून घ्यायला तयार आहे, असे आश्वासन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी भोमवासीयांना दिले आहे. यासंबंधात भोमवासीयांना चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी सोमवारी मंत्रालयात बोलावले असून तेथे हायवेच्या तांत्रिक विभागाच्या अधिकाऱ्यांसह बैठक घेण्यात येणार आहे. या बैठकीत भोमवासीयांच्या सर्व शंकांचे निरसन होईल, असा दावा मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी केला आहे.**



प्रस्तावित रस्ता प्रकल्पामुळे स्थानिक घरे आणि मंदिर प्रभावित होऊ शकतात, अशी भीती व्यक्त करणाऱ्या भोमवासीयांनी मुख्यमंत्री डॉ. सावंत यांची साखळी येथे भेट घेतली. या भेटीवेळी मुख्यमंत्र्यांनी त्यांना आश्वस्त केले की, या रस्ता रुंदीकरणात गावातील एकाही घराचा किंवा मंदिराचा जराही भाग बाधीत होत नसून याबाबतच्या मूळ आराखड्याचे सादरीकरण तज्ज्ञ पान २ ▶

# श्रवण खूनप्रकरणी एकास अटक

टीम दैनिक हेराल्ड

**वाळपई, दि. १९ :** आंबेडे-नगरगाव येथील श्रवण देविदास बर्वे (२४ वर्षे) यांच्या खूनप्रकरणी वाळपई पोलिसांच्या तपासाला गती मिळाली असून, या प्रकरणी वासुदेव ओझरेकर (४२, आंबेडे-नगरगाव) याला अटक केली आहे. या प्रकरणाचा वेगाने तपास सुरू असून आणखीन काही जणांच्या मुसक्या आवळल्या जाण्याची शक्यता आहे. या प्रकरणात पोलिसांच्या हाती काही महत्त्वाचे धागेदोरे लागल्याने तपासात निर्णायक वळण येण्याची शक्यता आहे. हत्येमागील कारणांचा मागोवा घेण्यासाठी पोलिसांनी तपासचक्रे गतिमान केली आहेत, अशी माहिती पोलिस अधीक्षक अक्षत कौशल यांनी दिली.

श्रवण बर्वेचा खून झाल्याची माहिती मंगळवारी उघड झाली होती. त्यानंतर पोलिसांकडून वेगवेगळ्या दिशेने तपास सुरू होता. याच पार्श्वभूमीवर काल शुक्रवारी सायंकाळी पोलिसांनी सुमारे १५ जणांना ताब्यात घेतले होते. त्यानंतर पोलिस स्थानिकांना जबरदस्तीने या प्रकरणात गोवण्याचा प्रयत्न करत आहेत असा आरोप करून सुमारे १०० ग्रामस्थांनी वाळपई पोलिस स्थानकावर धडक दिली व ठिय्या आंदोलन करून ताब्यात घेतलेल्यांना त्वरित सोडण्याची मागणी केली. यानंतर चौकशीनंतर पोलिसांनी १२ जणांना सोडण्यात आले. उर्वरित तीन जणांना पोलिस पुढील चौकशीसाठी पर्वरी येथे घेऊन गेले. त्यांची सखोल चौकशी केल्यानंतर रात्री दोघा अल्पवयीन मुलांना सोडण्यात आले. मात्र, पित्याला चौकशीसाठी ठाण्यातच ठेवण्यात आले. सखोल चौकशीअंती वासुदेव ओझरेकर याला अटक करण्यात आली. या खूनप्रकरणात अनेकांचा समावेश असल्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली असून त्यांना लवकरच जेरबंद केले जाईल, असे अधीक्षक कौशल यांनी सांगितले.





### संशयास्पदरित्या आढळला होता मृतदेह

**श्रवण देविदास बर्वे याचा संशयास्पद मृतदेह काही दिवसांपूर्वी आढळून आला होता. शवविच्छेदन अहवालात गळा दाबून व श्वास कोंडल्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले होते. या प्रकरणामुळे संपूर्ण सत्तरी तालुक्यात खळबळ माजली आहे.**

### आणखीन काहीजणांचा समावेश

**श्रवण बर्वे खूनप्रकरणात वासुदेव याला जरी अटक केली असली तरी पोलिसांना तपासात काही महत्त्वपूर्ण धागेदोरे सापडले आहे. या खूनप्रकरणात आणखीही काही जणांचा समावेश असल्याची शक्यता असून त्या दिशेने पोलिस तपास करीत असल्याची माहिती उत्तर गोव्याचे पोलिस अधीक्षक अक्षक कौशल यांनी दिली आहे. लवकरच संशयितांना जेरबंद करू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.**

# किनारपट्ट्यांवरील सुरक्षेत सुधारणा झाल्याचा दावा

टीम दैनिक हेराल्ड

**कळंगुट, दि. १९ :** गोव्यातील समुद्रकिनारे आता अधिक सुरक्षित झाल्याचा दावा पोलिस अधीक्षक अक्षत कौशल यांनी केला आहे . गोव्याच्या समुद्रकिनाऱ्यांवरील पर्यटकांच्या सुरक्षेसंदर्भात महत्त्वाची माहिती देताना पोलिस अधीक्षक अक्षत कौशल यांनी सांगितले की, अलीकडील काही हिंसक घटना आणि दलालांच्या वाढत्या त्रासानंतर पोलिस आणि पर्यटक सुरक्षा दलाकडून जोरदार उपाययोजना राबवण्यात येत आहेत.

कौशल म्हणाले की, गोवा पोलिस दल कोणत्याही बेकायदेशीर कृती किंवा दलालांना अजिबात सहन करणार नाही. पर्यटक सुरक्षा दलाला स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत की समुद्रकिनाऱ्यांवर कोणतीही प्रतिबंधित किंवा संशयास्पद हालचाल आढळल्यास तत्काळ कारवाई करण्यात यावी. सदर दलालांविरुद्ध कडक

### ▶ बेकायदेशीर कृती किंवा दलालांना थारा नाहीच : अधीक्षक कौशल

कारवाई करताना त्यांना पकडून थेट पर्यटन संचालनालयाकडे हजर केले जाते, जिथे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाते. बेकायदेशीर कृतीत आढळल्यास अटकही केली जाते, अशी माहिती कौशल यांनी दिली.

२०२५च्या सुरुवातीपासून आतापर्यंत उत्तर आणि दक्षिण गोवा विभागात सुमारे १,००० दलालांवर कारवाई करण्यात आली आहे. अधिकृत वेळेनंतर समुद्रकिनाऱ्यावर मद्यपान करणाऱ्या १९४ व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच समुद्रकिनाऱ्यावर कचरा फेकल्याबद्दल ५४५ जणांना दंड ठोठावण्यात आला आहे, गुटखा सेवन करणाऱ्या २६५ जणांवरही कारवाई झाली आहे. याशिवाय, समुद्रकिनाऱ्यावर वाहन चालवणाऱ्या १४ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, असे कौशल यांनी स्पष्ट केले.

शॅकधारक व इतर व्यावसायिकांशी सातत्याने संपर्कात राहून पोलिसांकडून सुरक्षा उपाययोजना राबवण्यात येत आहेत. काही शॅकधारकांनी पोलिस संपर्कासाठी माहिती फलक लावले असून, स्थानिक व्यावसायिक आणि पोलिसांमध्ये योग्य समन्वय निर्माण झाला आहे, असेही कौशल यांनी नमूद केले. यावर्षी जानेवारी महिन्यात घडलेल्या दोन हत्यांच्या घटनांनंतर राज्य पोलिसांनी समुद्रकिनाऱ्यांवर २४ तास गस्त सुरू केली आहे. तसेच,रात्री ११ वाजेनंतर शॅक बंद ठेवण्याचे आदेश देखील लागू करण्यात आले आहेत.

स्थानिक पोलिस ठाणीही या मोहिमेत सक्रीयपणे सहभागी असून, समुद्रकिनाऱ्यांवरील सुरक्षेसाठी आम्ही कटीबद्ध आहोत. पर्यटक आणि स्थानिक नागरिकांना सुरक्षित आणि आनंददायक अनुभव देणे हे आमचे प्राथमिक उद्दिष्ट आहे, असे कौशल यांनी सांगितले.

# व्हिला प्रकल्पांना नियमानुसार परवानगी दिल्याचे स्पष्टीकरण

टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १९ :** मांद्रे पंचायतक्षेत्रात मंजूर करण्यात आलेल्या 'व्हिला' प्रकल्पांबाबत ग्रामस्थांत तीव्र नाराजी असून, परस्पर देण्यात आलेल्या परवानग्यांबाबत ग्रामसभेच्या ठरावाला डावलल्याचा आरोप करत जागरूक नागरिकांनी सरपंच राजेश मांद्रेकर यांना निवेदन सादर केले. शनिवारी सरपंच राजेश मांद्रेकर यांची भेट घेण्यासाठी अ‍ॅड. प्रसाद शहापूरकर, राजेश मांद्रेकर, जगन्नाथ पार्सेकर , सद्गुरु नाईक, श्री गोवेकर यांच्यासह काही ग्रामस्थांनी उपस्थित राहून अधिकृत निवेदन सादर केले. यावेळी पंचायत मंडळाने दिलेल्या परवानग्या त्वरित मागे घेण्याची जोरदार मागणी करण्यात आली.

ग्रामसभेने पूर्वीच ठराव मंजूर केला होता की, कोणत्याही मोठ्या विकास प्रकल्पांना परवानगी देण्यापूर्वी ग्रामस्थांना विश्वासात घेणे आवश्यक आहे. मात्र, त्यानंतरही पंचायत मंडळाने स्थानिकांच्या सहमतीशिवाय 'व्हिला' प्रकल्पांसाठी परवानगी दिली आहे. त्यामुळे या परवानग्या त्वरित स्थगित करण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

अ‍ॅड. शहापूरकर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, शुक्रवारी झालेल्या बैठकीत मांद्रे पंचायत क्षेत्रात किती 'व्हिला' प्रकल्पांना परवानगी देण्यात आली याबाबत माहिती घेण्यासाठी आम्ही आज निवेदन सादर केले आहे. आमच्या माहितीनुसार, आतापर्यंत १८ व्हिला प्रकल्पांना व ५० हून अधिक फ्लॅट बांधकामांना परवानगी देण्यात आली आहे.

अ‍ॅड. शहापूरकर पुढे म्हणाले की, ज्या भूभागावर हे प्रकल्प उभे राहत आहेत, त्या क्षेत्राची माहिती पंचायतीकडून मिळवण्याचा प्रयत्न केला, मात्र कोणतीही स्पष्ट माहिती उपलब्ध झालेली नाही. गावाच्या हितासाठी आणि पर्यावरण रक्षणासाठी अशा प्रकल्पांना परवानगी देऊ नये. आधी मंजूर झालेल्या परवानग्याही तत्काळ स्थगित कराव्यात. पत्रकारांनी ग्रामस्थांच्या कमी उपस्थितीबद्दल विचारले असता अ‍ॅड. शहापूरकर म्हणाले, ग्रामस्थ आपल्या प्रभागातील प्रतिनिधी निवडून देतात. त्यामुळे प्रभागातील नागरिकांची जबाबदारी प्रतिनिधींवर असते. सर्वसामान्य नागरिक आपल्या दैनंदिन कामांमुळे नेहमी उपस्थित राहू शकत नाहीत. मात्र, विरोधाचा सूर उठवणे महत्त्वाचे आहे.

सरपंच राजेश मांद्रेकर यांनी यासंदर्भात स्पष्टीकरण देताना सांगितले की, टीसीपी व इतर संबंधित शासकीय खात्यांकडून कायदेशीर परवानग्या मिळाल्यानंतरच १८ व्हिला' प्रकल्पांच्या फायली पंचायतीकडे आल्या होत्या. त्या फायली २० दिवस आमच्याकडे होत्या. नियमानुसार ३० दिवसांत परवानगी न दिल्यास ती आपोआप मंजूर होते. त्यामुळे आम्ही कायदेशीर प्रक्रियेनुसार परवानगी दिली. ते पुढे म्हणाले, माझ्या कारकिर्दीत १८ प्रकल्पांना परवानगी दिली आहे. यापूर्वी मी सरपंच नसताना ३८ प्रकल्पांना परवानगी देण्यात आली होती. तसेच काही फ्लॅट प्रकल्पांना देखील बांधकामाची परवानगी दिलेली आहे.

# ठाकरे बंधूंमध्ये सलोख्याचे संकेत

## महाराष्ट्रात नवा राजकीय अध्याय? मराठी राजकारणात मोठा बदल होण्याची चिन्हे

**मुंबई, दि. १९ :**

महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक वर्षांपासून एकमेकांपासून दुरावलेले ठाकरे बंधू उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येण्याच्या शक्यता पुन्हा एकदा चर्चेत आहेत. दोघांनीही शनिवारी दिलेल्या सकारात्मक वक्तव्यांमुळे, मराठी राजकारणात मोठा बदल होण्याची चिन्हे दिसत आहेत.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) प्रमुख राज ठाकरे यांनी अभिनेते व दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या पॉडकास्ट मुलाखतीत स्पष्ट शब्दांत सांगितले, महाराष्ट्राचे हित माझ्यासाठी सर्वोच्च आहे. वैयक्तिक मतभेद फार किरकोळ आहेत. उद्धव ठाकरे यांच्यासोबत काम करण्यास मी तयार आहे. पण प्रश्न आहे – ते तयार आहेत का? या वक्तव्याला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी तत्काळ प्रतिसाद दिला. मुंबईत शिवसेनेच्या कामगार संघटनेच्या





सभेत बोलताना त्यांनीही सलोख्याची तयारी दर्शवली. महाराष्ट्राच्या आणि मराठी माणसाच्या हितासाठी मीही मतभेद बाजूला ठेवण्यास तयार आहे. पण, जो कोणी महाराष्ट्रविरोधी शक्तींशी संगत करतो, त्याच्यासोबत मी चालणार नाही, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला.

या विकासावर प्रतिक्रिया देताना शिवसेना (उ.बा.ठा) नेते संजय राऊत म्हणाले, ही चर्चा महाराष्ट्रासाठी सकारात्मक आहे. दोघे नेते एकत्र आले तर भाजपसारख्या ताकदवान विरोधकांवर मराठी पक्षांची ताकद वाढेल. मात्र आम्ही 'वेट अँड वॉच'च्या भूमिकेत आहोत. दरम्यान, अलीकडेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे राज ठाकरे यांच्या निवासस्थानी स्नेहभोजनासाठी गेले होते. त्यानंतर शिंदे गट व मनसे युतीच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. अशा पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांचे उद्धव ठाकरेंबाबतचे वक्तव्य महत्त्वाचे मानले जात आहे. काही राजकीय विश्लेषकांच्या मते, हा एक नवा राजकीय प्रयोग असू शकतो. या घडामोडींवर जुने शिवसैनिक व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनीही सकारात्मक प्रतिक्रिया दिली. ठाकरे बंधूंनी एकत्र यावे ही अनेकांची इच्छा आहे. दोघांनी एकत्र निवडणूक लढवली, तर त्यांचा प्रभाव निश्चित वाढेल, असे त्यांनी स्पष्ट केले. मुंबई महापालिकेच्या आगामी निवडणुका, मराठी अस्मिता आणि हिंदुत्वाच्या पार्श्वभूमीवर या दोन्ही नेत्यांचा संभाव्य सलोखा, महाराष्ट्रातील राजकीय गणितं बदलवणारा ठरू शकतो, असे म्हटले जात आहे.

# सोन्याच्या दराने गाठला ९८ हजारांचा पल्ला

**नवी दिल्ली, दि. १९ :**

सोन्याच्या दरात सुरू असलेली तेजी कायम असल्याचे पहायला मिळत आहे. गेल्या काही दिवसांपासून सोन्याच्या दरात सातत्याने वाढ होत असून दररोज नवनवीन उच्चांकी दर गाठत आहे. या दरवाढीमुळे लग्नसराईसाठी दागिने खरेदी करणाऱ्या ग्राहकांचा हिरमोड होत आहे. शनिवारी भारतात आज २४ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ९,८०० रुपये, २२ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ८,९४६ रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ७,३२० रुपये आहे.

एक लाखापासून सोनं अवघे दोन हजार रूपये दूर आहे. अमेरिकेत ट्रम्प यांनी घेतलेल्या आक्रमक निर्णयांमुळे जागतिक मंदीचा धोका वाढल्याचं चित्र आहे. सोन्याच्या दरात रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे सोन्याचे दर लवकरच एक लाखांच्या वरती जाणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. अलीकडे जागतिक स्तरावर घडलेल्या काही आर्थिक अस्थिरतेमुळे सोन्याकडे सुरक्षित गुंतवणुकीच्या पर्यायाकडे पाहिलं जात आहे. त्यामुळे त्याच्या किमतीत वाढ होत असल्याचं मत तज्ज्ञांनी व्यक्त केलं आहे.

१८ एप्रिल रोजी भारतात २४ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ९,७३२ रुपये, २२ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ८,९२१ रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर ७,३०० रुपये होता. आज पुन्हा एकदा सोन्याच्या किंमतीत वाढ झाली आहे. सोन्याच्या किंमतीत गेल्या काही दिवसांपासून सतत वाढ होत आहे. त्यामुळे लवकरच सोन्याच्या किंमती १ लाखांचा टप्पा गाठणार असल्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तवली आहे. चांदीचा भाव प्रति ग्रॅम ९९.९० रुपये आणि प्रति किलोग्रॅम ९९,९०० रुपये होता. त्यामुळे आज सोन्याच्या किंमतीत वाढ झाली असली तरी चांदीच्या किंमतीत कोणताही बदल झालेला नाही. अमेरिका आणि चीनमध्ये सुरू असलेल्या टॅरिफ वॉरचा फटका हा जगाला बसत असून त्यामुळेच सोन्याच्या किमतीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. गेल्या काही दिवसांपासून सोन्याच्या किमतीमध्ये सातत्याने वाढ होताना दिसत आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासह अनेक देशांवर मोठा आयात शुल्क लावण्याचा निर्णय घेतला होता. त्यावेळी सोन्याच्या किमतीमध्ये काहीशी घट होऊन ती ८७ हजारांच्या जवळपास गेली होती. पण नंतर चीन वगळता इतर सर्वच देशांवरील आयातकर हा १० टक्क्यांवर करण्याचा निर्णय ट्रम्प यांनी केला. पण हा कालावधी फक्त ९० दिवसांपुरता आहे. त्यानंतर डोनाल्ड ट्रम्प काय निर्णय घेतील याचा अंदाज लावता येत नाही.